महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती
# महाराष्ट्र जनशक्ती
मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २४७ वा | दिनांक : २७/०७/२०२५ | वार : रविवार

## धनंजय मुंडेंना मंत्रिपद देण्यापूर्वी आम्हाला विष द्या : करुणा शर्मा



**मुंबई :** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांना पुन्हा एकदा मंत्रिमंडळात सामावून घेण्याच्या चर्चेने जोर धरला आहे. धनंजय यांच्या दुसऱ्या पत्नी करूणा शर्मा मुंडे यांनी याला कडाडून विरोध केला आहे. अजित पवारांनी धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्रिपद देण्यापूर्वी आम्हाला विष द्यावे, असे त्या म्हणाल्यात.

मुंबई उच्च न्यायालयाने कृषि साहित्य खरेदी प्रकरणात धनंजय मुंडे यांना दिलासा दिला आहे. त्यानंतर अजित पवार यांनी त्यांना पुन्हा मंत्रिपद देण्याचे संकेत दिलेत. वाल्मीक कराड प्रकरणात धनंजय मुंडे यांना क्लीनचिट मिळाल्यानंतर विशेषतः त्यांचा त्या प्रकरणाशी संबंध नसल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्यांना पुन्हा मंत्रिपदावर संधी दिली जाईल, असे ते म्हणालेत. या पार्श्वभूमीवर करूणा शर्मा मुंडे यांनी अजित पवारांकडे आपल्याला विष देण्याची मागणी केली आहे.

करूणा शर्मा मुंडे म्हणाल्या की, अजित पवार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. ते धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्रिपद देण्याची भाषा करत आहेत. ते लोकप्रतिनिधी आहेत. पण धनंजय मुंडे लोकप्रतिनिधी नाही. ते फक्त त्यांचा विचार करतात. जिल्ह्यात महादेव मुंडे व संतोष देशमुख हत्या प्रकरणासारख्या अनेक घटना समोर आल्यात. धनंजय मुंडे यांनी शासन व प्रशासनाचा गैरवापर करत जिल्ह्यात काळा कारभार व साम्राज्य पसरवले आहे. त्यानंतरही तुम्ही अशा घाणेरड्या व्यक्तीला मंत्रिपद देण्याची गोष्ट करत आहात का? तुम्हाला येथील जनतेचे दुःख दिसत नाही का?

लोकप्रतिनिधी असताना त्यांनी महादेव मुंडे, संतोष देशमुख व माझ्या मुलाबाळांची काय अवस्था करून ठेवली होती हे इथे याऊन पाहा. तुम्हाला त्या माणसाविरोधात पुरावे हवे असतील तर मी देते. मला वेळ द्या. मी सर्व घेऊन येते. ते एकदा पाहा. त्यानंतर विचार करा. अशा घाणेरड्या व्यक्तीला मंत्रिपद देणे आम्ही सहन करणार नाही. त्यांना मंत्रिपद द्यायचे असेल तर प्रथम ज्ञानेश्वरी मुंडे, संतोष देशमुख यांच्यासह माझ्या अर्थात करूणा शर्माच्याही कुटुंबाला विष द्या. त्यानंतर त्यांना मंत्रिपद द्या.

धनंजय मुंडे यांच्याऐवजी इतर कोणत्याही चांगल्या माणसाला मंत्रिपद द्या. कारण, धनंजय यांना मंत्रिपद देणे हे महाराष्ट्रातील जनता सहन करणार नाही. धनंजय यांच्यासह त्यांचे कार्यकर्ते अजूनही माजलेलेच आहेत, असेही करूणा शर्मा यावेळी बोलताना म्हणाल्या.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी निर्घृण हत्या करण्यात आली. या प्रकरणी माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा विश्वासू वाल्मीक कराड याला अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर मकोका अंतर्गतही कारवाई करण्यात आली आहे. सध्या तो सध्या बीड जिल्हा कारागृहात खडी फोडत आहे. त्याला तिथे व्हिआयपी ट्रिटमेंट मिळत असल्याचा आरोप केला जातो. पण पुढे काहीच होत नाही. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने कृषि साहित्य खरेदी प्रकरणात धनंजय मुंडे यांना कथित क्लीनचिट दिल्यामुळे अंजली दमानिया यांच्यासह अनेकांनी संताप व्यक्त केला आहे.

## तुला हीच जागा आठवली का हे बोलण्यासाठी? अजित पवार

**पुणे :** नेहमीच ठाम, थेट आणि वेगवान कामशैलीसाठी प्रसिद्ध असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार पुन्हा एकदा त्यांच्या शैलीमुळे चर्चेत आले आहेत. एका पत्रकार परिषदेदरम्यान एका व्यक्तीने थेट सरकारी नोकरीची मागणी केल्याने अजित पवार त्या व्यक्तीवर संतापल्याचे पाहायला मिळाले. त्यांनी समोरच्या व्यक्तीला बोलण्याची ही पद्धत नाही, असे म्हणत चांगलेच सुनावले असून, नियमात बसत असेल तर शंभर टक्के लाभ मिळेल असे आश्वासनही दिले आहे.

हा संपूर्ण प्रकार पुण्यातील एका पत्रकार परिषदेदरम्यान घडला. अजित पवार माध्यम प्रतिनिधींच्या प्रश्नांना उत्तर देत असताना, अचानक एका तरुणाने थेट त्यांच्या पुढे येऊन "दादा, मला सरकारी नोकरी द्या" अशी मागणी केली. सुरुवातीला पवारांनी संयम राखत, हा मुद्दा क्रीडा विभागाशी संबंधित असल्याने त्या व्यक्तीने राज्याचे क्रीडा मंत्री दत्ता भरणे यांची भेट घ्यावी, असा सल्ला तरुणाला दिला.

अजित पवारांनी सल्ला दिल्यानंतरही तो युवक बोलतच राहिला. यावर अजित पवार यांनी नाराजी व्यक्त करत "तुला हीच जागा आठवली का हे बोलण्यासाठी?" असा सवाल संबंधित तरुणाला केला. त्यानंतरही त्या व्यक्तीने थांबण्याचे नाव न घेतल्याने "ए, बोलायची ही पद्धत नाही!" असे म्हणत अजित पवारांनी थांबवले. तसेच "मी माहिती घेईल. मी कागद घेईन. तो व्यवस्थित पाहीन. तू बोलतोय त्यात तथ्य आहे का? हे बघेन. राज्य सरकारचं जे क्रीडाविषयक धोरण असेल त्यात तू बसत असशील तर शंभर टक्के तुझं काम होईल. तू सरकारच्या धोरणात बसत नसशील तर तुला तसे कळवण्यात येईल,' असे थेट अजित पवार यांनी त्या व्यक्तीला समजावले.

उपमुख्यमंत्री अजित पवारांनी 'लाडकी बहीण' योजनेबद्दलही महत्त्वपूर्ण माहिती दिली. ज्या पुरुषांनी या योजनेचा गैरवापर करून लाभ घेतला आहे, त्यांच्याकडून पैसे वसूल करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अजित पवार म्हणाले की, या योजनेत पुरुष लोकांची नावे येण्याचे काहीच कारण नाही. जर या योजनेत पुरुषांची नावे आलेली असतील, तर ही योजना पुरुषांसाठी नव्हती, त्यामुळे ते पैसे आम्ही वसूल करू. त्यांनी जर सहकार्य केले नाही तर, 'लाडकी बहीण' योजनेचा गैरफायदा घेऊन जर त्यांनी या योजनेचा लाभ घेतला असेल, तर त्यांच्यावर आम्ही कारवाई करण्यास मागे-पुढे पाहणार नाही, असा इशारा अजित पवारांनी दिला.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २७ जुलै २०२५

# श्रीकृष्ण महाविद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा..



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** कारगिल युद्धा म्हणजे भारतीय सैनिकांचे अप्रतिम साहस व शौर्याचे प्रतीक असून ,भारताच्या आंतरराष्ट्रीय मुत्सरगिरीचे ज्वलंत उदाहरण असून ,स्वतःचे अस्तित्व राखण्याचे अबाधित ठेवण्याचे इतिहासिक कार्य आहे.तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात मोठ्या उत्साहाने कारगिल विजय दिनानिमित्त डॉ.आर.एन.निगडे यांच्या अध्यक्षतेखाली ,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एम.राठोड यांच्या उपस्थितीत कारगिल विजय दिनानिमित्ताने अभिवादनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.उमाकांत सूर्यवंशी बोलत होते. ते पुढे म्हणाले की भारत हा शांतताप्रिय राष्ट्र असून ,भारत स्वतःहून कधीही कुणावर आक्रमण केले नाही. आपल्या देशाचे संरक्षण करण्यासाठी अनेक जवानानी आपल्या जीवाची आहुती दिली,प्राणपणाने आपले व आपल्या देशाचे रक्षण केले, त्याचे स्मरण म्हणून अशा अभिवादनाचे कार्यक्रम आवर्जून घेतले पाहिजे,त्यांचे स्मरण केले पाहिजे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.नागसेन कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शनानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# दगडोजीराव देशमुख महाविद्यालयात कारागीर विजय दिन साजरा



**वाळूज :** दगडोजीराव देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाळूज येथे इतिहास व अर्थशास्त्र विभागातर्फे २६ जुलै २०२५ रोजी कारागील विजय दिन साजरा करण्यात आला यावेळी इतिहास विभाग प्रमुख डॉ. सचिन साळवे यांनी कारगिल शहीद अणि भारतीय सैनिक यांच्या पराक्रम इतिहास वर्णन केला यावेळी अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ विनायक शिंदे, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भूगोल विभागाचे डॉ विजय बैसाणे डॉ. पिराजी डूमनार, डॉ संजय पिटाले , प्रा.नागेश बोनतेवाड, सतीश वैष्णव यांची उपस्थिती होती, यावेळी भारत माता की जय जयघोषाने कार्यक्रमाची समाप्ती झाली, मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी व प्राध्यापकांची उपस्थित होती

# फतियाबाद येथे रिपब्लिकन सेना सभासद नोंदणी व पक्ष प्रवेश कार्यक्रम घेण्यात आला



**फतियाबाद (जावेद अहेमद) :** दि.25/07/25 रोजी नामदेव साठे नगर, बुद्ध विहार परिसर फतियाबाद ता.गंगापर जि .छ.संभाजीनगर येथे मा. मिलिंद बनसोडे मराठवाडा अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली रिपब्लिकन सेना किर्याशील सक्रिय सभासद नोंदणी व पक्ष प्रवेश कार्यक्रम घेण्यात आला. सभासदांच्या नोंदणी करण्यात आलीकार्यक्रमाचे आयोजन बबन साठे यांनी केले होतेविजय शिंदे मराठवाडा उपाध्यक्ष पदासाठी नियुक्ती करण्यात आली. लखन थोरात यांची गंगापूर ता उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली.डिगंबर धनवटे ग्रा.पं सदस्य रामपुरी, रोहीदास दाणे जंभाळा,इंजिनीअर विलास आनंदराव प्रमुख उपस्थिती मध्ये सुनील अण्णा मनोरे मराठवाडा उपाध्यक्ष, काकासाहेब गायकवाड जिल्हा अध्यक्ष पश्चिम, मिलिंद मोकळे जिल्हा अध्यक्ष पुर्व, मनिषाताई साळुंखे जिल्हा अध्यक्ष महिला आघाडी, रंजनाताई साठे तालुका उपाध्यक्ष गंगापूर, योगेश दाणे जिल्हा संघटक पश्चिम, विनोद वाकोडे तालुका अध्यक्ष पश्चिम, राजेश भालेराव तालुका उपाध्यक्ष पश्चिम,कुंदन मोरे तालुका सचिव पश्चिम, विजय बनसोडे शाखा अध्यक्ष फतियाबाद, कृष्णा भालेराव शाखा उपाध्यक्ष फतियाबाद, सतिश मोरे शाखा अध्यक्ष रामपुरी, अमोल थोरात शाखा अध्यक्ष टाकळी, माजी सरपंच फतियाबाद जनार्धन काका गवळी ,बाळु गायकवाड,चैनसिंग ठाकुर, आनंद साठे, विठ्ठल जाधव, बाबासाहेब मोरे, बाबासाहेब जाधव, अविनाश काटकर, किशोर मोरे,बबन जाधव, अक्षय गायकवाड, शोभाताई भालेराव, आशाबाई गायकवाड, ताराबाई बनसोडे, सविता जाधव,संध्या गायकवाड,पुनम ठाकुर, ताराबाई काटकर,ऊषा बनकर, लताबाई जाधव,शिलाबाई जारवाल,चंदा जाधव,साबेरा आपा, शशिकला जाधव आदिसह कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २७ जुलै २०२५


## दौलताबाद बस स्टँड रस्त्यावर साचले पाणी




**दौलताबाद (जावेद अहेमद) :** दौलताबाद बस स्टँड रस्त्यावर साचले पाणीयेणारे पर्यटक व भाविकांना त्रासदौलताबाद खुलताबाद रस्त्यावर बस स्टँड जवळ ग्रामपंचायत गाळ्या समोर पाऊस आल्यानंतर नेहमीच पाणी साचले जाते काही वर्षापूर्वी रस्त्याचे काम करतात आले होते त्यावेळी रस्त्याच्या दोन्ही बाजूला सिमेंट काँक्रीट ची नाली तयार करण्यात आली होतीकालत्राने काही लोकांनी स्वतच्या फायद्यासाठी दोन्ही बाजूच्या नाली बंद करून टाकल्या आहे संबंधित विभागाचे याकडे लक्ष नसल्याने आज हे पाणी पूर्ण रस्त्यावर साचलेले आहे या पाण्यामुळे पायी येणाऱ्या जाणाऱ्या पादचारी यांना नाइलाजाने पाण्यातून जावे लागते तसेच आता श्रावण महिना असल्याने अनेक भाविक भक्त भद्रा मारुती दर्शनासाठी येतात व सोबत देश विदेशातील अनेक पर्यटक पर्यटनासाठी येत आहे येणारे जाणारे वाहनांमुळे पाणी उडत आहेत अनेक लहान मोठे अपघात होत आहेशाळकरी मुलांना सुद्धा नाहक त्रास सहन करावा लागत आहेतरी संबंधित विभागाच्या वतीने या रस्त्यावर असलेल्या पाणी ची व्यवस्था करण्यात अशी मागणी नागरिक व वाहनचालक आणि दुकानदार करत आहे

## ‘एक पेड माँ के नाम' या योजने अंतर्गत वृक्षदिंडी व वृक्ष लागवड करण्यात आली




**भराडी :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा भराडी ता.सिल्लोड येथे. मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'एक पेड माँ के नाम' या योजने अंतर्गत वृक्षदिंडी व वृक्ष लागवड करण्यात आली.या प्रसंगी केंद्रप्रमुख राजु महाजन केंद्रीय मुख्याध्यापक दिलीप सुसुंद्रे. शिक्षक दीपक सोनवणे, अथहर शेख, सय्यद मुश्ताक, श्रीम. प्रणाली दानवे, योगीता दुसारिया, प्रतिभा वाघ, डिंम्पल राऊत, अतिका बेगम, हुमेरा वाहेद, परवीन शहा आदि शिक्षक उपस्थित होते

## पत्रकाराला धमकी प्रकरणी मुरूम शहर पत्रकार संघाचं पोलिसांना निवेदन



**मुरूम (प्रा. डॉ सुधीर पंचगल्ले) :** मुरूम शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष आणि अधिस्वीकृती धारक पत्रकार रामलिंग काशिनाथ पुराणे यांना बातमीत नाव न दिल्याच्या कारणावरून तुगाव (ता. उमरगा) येथील भालचंद्र अंकुश लोखंडे या व्यक्तीने अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची आणि खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे.

या घटनेच्या निषेधार्थ आणि आरोपीविरोधात कडक कारवाईची मागणी करत मुरूम शहर पत्रकार संघटनेने दिनांक २६ जुलै २०२५ रोजी मुरूम पोलीस ठाण्यात लेखी निवेदन सादर केलं. या निवेदनात संबंधित आरोपीवर ‘पत्रकार संरक्षण कायदा’ आणि भारतीय दंड संहितेतील (IPC) संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदवून तात्काळ अटकेची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात स्पष्ट करण्यात आलं आहे की, दिनांक २५ जुलै रोजी तुगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या उद्घाटन कार्यक्रमाची बातमी रामलिंग पुराने यांनी त्यांच्या डिजिटल माध्यमावर प्रसिद्ध केली होती. या बातमीत नाव न आल्याने संतप्त झालेल्या भालचंद्र लोखंडे यांनी फोनवरून अश्लील भाषा वापरत पत्रकाराला जीवे मारण्याचा दम दिला, तसेच खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिली.

पत्रकार संघटनेने याप्रकरणी चिंता व्यक्त करत म्हटलं आहे की, "बातमी संकलन व प्रसारण हे पत्रकाराचं कर्तव्य आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा संविधानिक अधिकार असून, त्यावर अशा धमक्या म्हणजे थेट पत्रकारितेवरच हल्ला आहे."

याशिवाय, संबंधित आरोपीचा राजकीय दबाव आणि पार्श्वभूमी लक्षात घेता, या प्रकाराकडे गंभीर दृष्टीने पाहण्याची आवश्यकता असल्याचंही संघटनेने स्पष्ट केलं आहे.

सदर निवेदनावर मोहन जाधव, नहीरपाशा मासुलदार, अजिंक्य मुरूमकर, रफिक पटेल, रवी अंबुसे, राजेंद्र कारभारी, इम्रान सय्यद, लखन भोंडवे, हुसेन नूरसे यांच्यासह अनेक पत्रकारांनी सह्या करून एकजूटीतून पत्रकारांच्या सुरक्षेचा आवाज बुलंद केला आहे.

संघटनेने इशारा दिला आहे की, जर प्रशासनाने या प्रकरणात तातडीने आणि ठोस पावले उचलली नाहीत, तर जिल्हास्तरीय तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २७ जुलै २०२५

# २७ जुलै १९७८ हा नामांतर आंदोलनातील अविस्मरणीय ठराव दिन होय : बी. बी. मेश्राम




मित्र 👭👭👭 हो, नामांतर आंदोलनाच्या ऐतिहासिक पाऊलखुणा तपासताना 27 जुलै 1978 या तारखेला त्या आंदोलनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण याच दिवशी महाराष्ट्र राज्याच्या दोन्ही सदनात विद्यापीठाच्या नामांतराचा ठराव संमत करण्यात आला होता. ही बाब सामाजिक न्याय, ओळख, प्रतिष्ठा आणि बहुजन समाजाच्या हक्क अधीकाराशी निगडित आहे. या आंदोलनाचे पार्श्वभूमी समजून घेताना काही महत्त्वाचे ऐतिहासिक आणि सामाजिक घटक लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. Symbol of knowledge अर्थात ज्ञानाचे प्रतीक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे संविधानाचे निर्माते असून समाज सुधारक व वंचित, पीडितांच्या आंदोलनाचे प्रणेते होते. ज्यांनी शैक्षणिक सुधारणा, मानवी हक्क, आत्मसन्मान, आत्मभान येण्यासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय प्राप्त करून घेण्यासाठी सामाजिक जीवनात शेवटच्या श्वासापर्यंत संघर्ष केला परिणामी वंचित मूलनिवासी बहुजन समाजासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक प्रेरणादायी नेतृत्व ठरले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 8 जुलै 1945 ला पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली होती. ज्या अंतर्गत 20 जून 1946 ला मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची तर औरंगाबाद येथे 19 जून 1950 ला मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली आहे. त्यावेळी मिलिंद महाविद्यालयाच्या पायाभरणी प्रसंगी गोविंद भाई श्रॉफ आणि माणिकचंद पहाडिया यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भेटीला आले होते. त्या शिष्टमंडळाने 'आपण हे जे महाविद्यालय सुरू करीत आहात, ते या ठिकाणी चालेल काय? असा शंकास्पद प्रश्न उपस्थित केला होता. तेव्हा बाबासाहेब आंबेडकर उद्गारले होते की, येथे केवळ एक महाविद्यालय उभारून चालणार नाही तर एक विद्यापीठ सुद्धा उभारले पाहिजे, अशी इच्छा व्यक्त केली होती. यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक दूरदृष्टी आपल्या लक्षात येते. त्यांनी जागतिक स्तरावरील उच्च कोटींच्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठातून ज्ञानार्जन केले होते. त्यामुळे सिम्बॉल ऑफ नॉलेज अर्थात ज्ञानाचे प्रतीक संबोधले जाते. तसेच, विद्यार्थी या शैक्षणिक संस्थेतून तयार व्हावेत जेणेकरून मानवतावादी आधुनिक समाज निर्माण करता येईल ही त्यांची अपेक्षा होती. 15 डिसेंबर 1952 ला एल्फिन्स्टन कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनात आधुनिक विद्यार्थ्यांच्या समस्यांवर मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आधुनिक जगातील आवश्यकतेच्या पूर्ततेसाठी केवळ प्रशिक्षित कारकुनांची निर्मिती करणारे केंद्र चालवून काम भागणार नाही, तर शक्तीवर्धक ज्ञानाचे प्रतीक असणारे विद्यापीठ चालवावे लागतील. विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाची उभारणी विद्यापीठातच होत असेल तर त्यांनी या अनुषंगाने फार सजग राहिले पाहिजे. विद्यापीठांच्या कारभारावर कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. विद्यापीठाने ठरविलेला निर्धारित अभ्यासक्रम शिकत असताना तो आपल्या बौद्धिक विकासाला खरोखरच पोषक व आवश्यक आहे किंवा नाही? याकडे पण चिकित्सकपने लक्ष केंद्रित केले पाहिजे. म्हणजे ज्ञानाची कास धरून आपल्या देशाचा विकास आणि उद्धार करून घ्यायचा असेल तर विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या कारभारात लक्ष घालून आपल्या हक्कांसाठी सतत झगडत राहिले पाहिजे. अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यापीठाची उपयोगिता कशी असावी? हे स्पष्ट केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांचे फलित म्हणून 23 आगस्ट 1958 ला मराठवाड्यातील औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. विद्यापीठाला काय नांव द्यावे? हे ठरविण्यासाठी नियुक्त केलेल्या शासकीय समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार मराठवाडा, औरंगाबाद, पैठण, प्रतिष्ठान, दौलताबाद, देवगिरी, अजिंठा, शालिवाहन, सातवाहन यासारखी स्थळ, भूमी व राज्यवाचक नांवे समोर आली होती. तसेच छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महान व्यक्तींची नावे सुद्धा पुढे आली होती. मात्र यापूर्वीच कोल्हापूर येथील विद्यापीठाला छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव दिले गेले असल्याने औरंगाबाद येथील विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नांवावर शिक्कामोर्तब करण्यासाठी राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात 27 जुलै 1978 ला एकमताने ठराव संमत करण्यात आला होता.

ही ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेता दक्खन-ए-खुसरू, मूल भारती संकल्पनेचे पितामह बी. श्यामसुंदर यांच्या नेतृत्वाखाली 1 जानेवारी 1965 ला नांदेड येथे संपन्न झालेल्या परिषदेत चार ठराव पास करण्यात आले होते. त्यापैकी तिसरा ठराव हा शेड्युल्ड कास्ट स्कॉलर व प्रामाणिक सहानुभूतीदार यांच्या नेतृत्वाखाली शेड्युल्ड कास्ट लोकांच्या विकासासाठी चालविले जाणारे विद्यापीठ त्वरीत निर्माण केले जावे. अशी भूमिका मांडण्यात आली होती. ज्यात डॉ. आंबेडकरांनी मुंबई व औरंगाबाद येथे सुरू केलेल्या महाविद्यालया सारखी महाविद्यालये इतरही राज्यात स्थापन व्हावीत. ज्यांना त्या त्या राज्यातील विद्यापीठांशी संलग्नित केली जावीत. तसेच डॉ. आंबेडकरांच्या नांवाने सुद्धा विद्यापीठ सुरू करावे. अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली होती. ज्याला 26 जानेवारी 1968 ला नांदेड येथे संपन्न झालेल्या दि ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट कॉन्फरन्स मध्ये मंजुरी देण्यात आली होती. पुढे बी. श्यामसुंदर यांनी मूल भारती समाजाच्या उत्थानाकरिता लढा देण्यासाठी 29 एप्रिल 1968 ला भारतीय भीम सेनेची स्थापना केली होती.

दरम्यान 1972 च्या काळात दलितांना गायरान जमिनी मिळाव्यात, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करावी. गावातील पाणवठ्यांवर भेदभाव न करता पाणी भरू देण्यात यावे. यासारख्या समस्यांना तोंड देण्यासाठी दलित पँथर उदयास आली. त्याच काळात औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यात यावे ही मागणी पुढे आली. ती सामाजिक सन्मान, ओळख आणि समानतेचा प्रतिक होती. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी शैक्षणिक कार्यासाठी, ज्ञानगंगा सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचावे म्हणून आपले संपूर्ण आयुष्य वेचले होते. म्हणून त्यांच्या नावे एक विद्यापीठ असावे, असे अनुयायाने वाटत होते. म्हणून ती मागणी रास्त होती. ज्याला दलित पँथर मधील तत्कालीन नेते राजा ढाले, नामदेव ढसाळ, प्रा. अरुण कांबळे, ज. वि. पवार, रामदास आठवले, गंगाधर गाडे सह इतर सर्व नेतृत्वाने नेटाने चालविण्याचा प्रयत्न केला. 1974 च्या मराठवाडा विकास आंदोलनातही नामांतराची मागणी करण्यात आली होती. 1977 ला तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी मागणीची दखल घेऊन आश्वासन दिले होते. मात्र 1978 ला सरकार बदलले आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुलोद सरकार सत्तारूढ झाले. विधान परिषदेत आमदार पा. ना. राजभोज यांनी मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करावे अशी मागणी लावून धरली होती. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी नामांतराबाबत पुढाकार घेऊन राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात 27 जुलै 1978 ला नामांतराचा ठराव मंजूर करून घेतला.

मात्र याची वार्ता समाजजीवनात पसरताच विघ्नसंतोषी समाजविघातक सवर्णांनी विद्यापीठाला केवळ एखाद्या व्यक्तीचे नाव देणे पक्षपाती ठरेल, असा युक्तिवाद करून नामांतराच्या मागणीला प्रखर विरोध केल्याने सरकारला अंमलबजावणी करणे अशक्य झाले. परिणामी संघर्ष सुरू होऊन दलितांवर अनन्वित अत्याचार करण्यात आले. नांदेड येथील दलित पँथरचे भीम सैनिक गौतम वाघमारे यांनी भर चौकात स्वतःला जाळून घेतले. परभणी जिल्ह्यातील पोचिराम कांबळे यांचे समाज कंटकांनी हात पाय तोडले आणि जर्जर करून ठार मारले. जनार्दन मवाडे, संगीता बनसोडे, सुहासिनी बनसोड, प्रतिभा तायडे, अविनाश डोंगरे, चंदर कांबळे, दिलीप रामटेके, रोशन बोरकर असे अनेक क्रांतिवीर नामांतरासाठी शहीद झाले. या अनुषंगाने प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर ते औरंगाबाद असा लाँगमार्च काढला होता. त्या लाँगमार्चला बुलढाणा जिल्ह्यातील रायरीच्या पुलावर अडविण्यात आले होते. त्यातील आंदोलकांना अटक करून राज्यातील विविध कारागृहात डांबण्यात आले होते. त्यामुळे प्रा. जोगेंद्र कवाडे यांना लाँगमार्च प्रणेते असे म्हटले जाते.

शेवटी 17 वर्षाच्या प्रदीर्घ आंदोलनाच्या संघर्षानंतर 14 जानेवारी 1994 ला 'मराठवाडा विद्यापीठाचा' विस्तार मराठवाडा हा शब्द कायम ठेवून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. असा नामविस्तार करण्यात आला. या आंदोलनामुळे जनजागृती होऊन सामाजिक समतेच्या लढ्याला बळ प्राप्त झाले. ही सर्व पार्श्वभूमी व इतिहास लक्षात घेतल्यावर नामविस्तार तर झाला पण त्यामुळे आंदोलन संपले की काय? पुढे काय? हा प्रश्न मात्र अनुत्तरित राहिला आहे. त्याची समर्पक उत्तरे आपण कधी शोधणार आहोत किंवा नाही? ज्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नांव दिलेले आहे. त्या विद्यापीठात बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान, विचारधारा किती प्रमाणात आणि कशाप्रकारे शिकविल्या जात आहे? विद्यापीठात महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा संशोधन केंद्र आहे. त्या अंतर्गत महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्यात बोटावर मोजता येतील एवढेच विद्यार्थी प्रवेश घेत असतात? म्हणजे विद्यापीठात अनेक विभागात ज्या प्रमाणात विद्यार्थी प्रवेश घेतात त्याचा विचार केला असता सर्वात कमी विद्यार्थी प्रवेश घेणारा विभाग म्हणजे महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा हा विभाग होय असे म्हटल्यास वावगे, अनुचित होणार नाही. ज्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिलेले आहे त्याच विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा शिकविण्याविषयी असणारी अनास्था अनाकलनीय आहे. या अनुषंगाने विद्यापीठात कार्यरत असणारे विद्वान प्राध्यापक मंडळी, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, कुलगुरू, कुलसचिव व इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी यावर विचार केला पाहिजे. संबंधित विषयाची एवढी दुरावस्था का? याची कारणे शोधून काढली पाहिजेत. त्या विषयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नेट, सेट, पेट परिक्षा देता येतात काय? नुकत्याच विद्यापीठाने 2024 मध्ये घेतलेल्या पेट परिक्षेत 'महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा' आणि 'पाली एंड बुद्धिजम' या विषयाचा नामोल्लेख सुद्धा टाळण्यात आला होता. म्हणजे यासारख्या विषयात विद्यार्थ्यांनी संशोधन करू नये, अशी विद्यापीठाची भूमिका असल्याची त्या पेटच्या नोटिफिकेशन्स मधून स्पष्ट झालेले आहे. विद्यापीठ त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व महाविद्यालयांना हे विषय शिकविण्यासाठी विशेष उपाययोजना करणार आहे काय? बार्टी सारख्या स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर संशोधन करण्यासाठी किती निधी खर्च करतात? यु जी सी सारख्या संस्था यासारख्या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यासाठी प्रयत्नशील आहेत काय? भारतातील सर्व केंद्रीय, राज्य, माहिती तंत्रज्ञान व मुक्त विद्यापीठ, खुले विद्यापीठे, विशेष विद्यापीठे तसेच खाजगी विद्यापीठातून सदरील विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करावेत? या विषयात शैक्षणिक अर्हता प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांना विविध नौक-यात सामावून घेतले पाहिजे. या विषयांत प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभात गौरव करण्यात आला पाहिजे. जेणेकरून विद्यार्थी संबंधित विषयात शिक्षण घेण्यासाठी पुढे येऊ शकतील. अशा सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे शोधून उपाययोजना केल्या तर या माध्यमातून सुद्धा विद्वान, प्रज्ञावान, शीलवान, चारित्र्यसंपन्न आंबेडकराईट निर्माण होऊ शकतील. ज्ञानाचे प्रतीक डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महासागरातून वेचलेले वैचारिक अनमोल मोती आपल्या जीवनात आकार देण्यासाठी सक्षम असल्याने ते समजून घेणे आवश्यक आहे. ही आपल्या जीवनाची प्राथमिकता असावी. ज्याची समाजाला नितांत आवश्यकता आहे. परिणामी भारताचे संविधानाला अपेक्षित आधुनिक भारतीय समाजाची निर्मिती होऊ शकेल.जय भीम!जय भीम!!जय भीम!!!



**लेखक : बी. बी. मेश्राम,**
संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, नॅशनल कौन्सिल नंबर ऑफ द ऑल इंडिया नाग असोसिएशन, (आईना) छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र, 431002.संपर्क : 9421678628 (C), 8983082128 (Wh).circumference१९६८@gmail.com

# यूजीसी नेट परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल पायल धनगर हिचा सत्कार



**जालना** : बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी पायल धनगर ही राज्यशास्त्र विषयात विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेल्या नेट परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल प्राचार्य डॉ. कविता प्राशर, विभाग प्रमुख डॉ.बळीराम कटारे, प्रा. गणेश जाधव यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आज तिचा सत्कार केला.

एक गुणवंत विद्यार्थी म्हणून पायल हिने महाविद्यालयात पदवीच्या वर्षात विविध उपक्रमात योगदान दिले. परीक्षेत उत्तम गुण मिळविण्याबरोबरच सांस्कृतिक उपक्रमासह विविध स्पर्धा यात तिने सक्रिय सहभाग घेतला होता.

अनेक विद्यार्थ्यांना एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून पायल हिची शैक्षणिक वाटचाल आहे. भविष्यातील वाटचालीसाठी तिला यावेळी शुभेच्छा देण्यात आल्या.

**महाराष्ट्र जनशक्ती**
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २७ जुलै २०२५

# तंत्रज्ञानावर आधारित जगात मानव्यविद्या का महत्त्वाच्या आहेत?

साहित्य, तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र किंवा ललित कलांसारख्या 'मानव्यविद्या' विषयांचे (soft disciplines) अवमूल्यन तरुण पिढीच्या मानसिक, बौद्धिक विकासासाठी अत्यंत विनाशकारी ठरेल. मानव्यविद्या विषयांचा अभ्यास केल्याने विचारसरणी चिकित्सक होते.

एखाद्या नोकरशहा, उद्योगपती किंवा धोरणकर्त्याला आपण एक राष्ट्र म्हणून प्रगती करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे असे विचारल्यास, ते कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), रोबोटिक्स, मशीन लर्निंग, डेटा सायन्स आणि माहिती तंत्रज्ञान यावर प्रचंड भर देण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे, जर तुम्ही मध्यमवर्गीय पालकांना त्यांच्या पसंतीबद्दल विचारले, तर ते त्यांच्या मुलांना STEM (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित) विषय निवडण्यास आणि अभियंता, डॉक्टर किंवा तंत्र-व्यवस्थापक म्हणून आयुष्यात स्थायिक होण्यास सांगतील हे ऐकायला मिळण्याची शक्यता आहे.

खरंच, 'संबंधित' शिक्षणाच्या या सर्वव्यापी कल्पनेत, उदारमतवादी कला, मानव्यशास्त्र आणि सामाजिक शास्त्रे यासारख्या 'सॉफ्ट' विषयांचा आग्रह धरणे सोपे नाही. खरं तर, तुमच्या मुलाला भौतिकशास्त्र आणि इतिहास, किंवा लेखाशास्त्र आणि तत्त्वज्ञान शिकायचे असले तरी, विज्ञान, कला आणि वाणिज्य या विषयांच्या अत्यंत गुंतागुंतीच्या आणि कठोर वर्गीकरणामुळे आपल्याकडे हे करणे जवळजवळ अशक्य आहे. एवढेच नाही तर मानव्यविद्या निवडणे हे पराभवाचे लक्षण मानले जाते असे वाटते!

खरं तर, अनेकदा असा युक्तिवाद केला जातो की 'सॉफ्ट' विषय हे निरुपयोगी आहेत, कारण तुमचे इतिहास किंवा साहित्यातील ज्ञान बाजारपेठेच्या भरभराटीस किंवा तंत्रज्ञानाच्या वाढीस मदत करत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, केवळ बाजारपेठ-आधारित साधने (instrumental reasoning) आपल्या काळात प्रभावी चर्चेचे बनली आहे; महाविद्यालये/विद्यापीठांना उदयास आलेल्या नव-उदारमतवादी (neoliberal) प्रमुखांच्या आदेशांचे पालन करण्यास सांगितले जाते; आणि शिक्षण हे केवळ तंत्र-आर्थिक वाढीसाठी नोकरी-केंद्रित कौशल्य बनले आहे. त्यामुळे, जगभरात महाविद्यालये आणि विद्यापीठे त्यांच्या उदार कला आणि मानव्यविद्या विभागांना कमी प्रवेशामुळे बंद करत आहेत हे पाहून आश्चर्य वाटायला नको, कारण ज्ञानाची ही क्षेत्रे 'नफाहीन' मानली जातात.

तरीही, या प्रवृत्तीला शैक्षणिक कल्पनाशक्तीची (pedagogic imagination) दरिद्रता मानण्यास मला कोणताही संकोच वाटत नाही. खरं तर, साहित्य, तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र किंवा ललित कलांसारख्या 'सॉफ्ट' विषयांचे वाढते अवमूल्यन या अशांत काळात वाढणाऱ्या तरुण पिढीच्या मानसिक, बौद्धिक विकासासाठी तसेच राजकीय-ऐतिहासिक संवेदनांसाठी अत्यंत विनाशकारी ठरेल. या संदर्भात, माझ्या स्वतःच्या शैक्षणिक प्रवासावर-भौतिकशास्त्र आणि गणिताकडून समाजशास्त्राकडे-विचार करणे अयोग्य ठरणार नाही. अर्थात, भौतिकशास्त्र आणि गणिताने मला काही प्रकारची वैज्ञानिक-गणितीय विचारसरणी विकसित करण्यास मदत केली. परंतु नंतर, समाजशास्त्र आणि मानव्यविद्यांनी मला वेगळ्या अर्थपूर्ण मार्गाने समृद्ध केले.

प्रथमतः यामुळे माझ्या राजकीय-ऐतिहासिक संवेदनशीलतेला धारदार बनवले. मोठ्या सामाजिक आणि राजकीय विकासाच्या संदर्भात मी माझ्या स्वतःच्या चरित्राचा अर्थ लावू शकलो - उदाहरणार्थ, आधुनिकता, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रवाद, जात, वर्ग, वांशिक विभागणी, पितृसत्ता, स्त्रीवादी प्रतिपादने आणि नवीन सामाजिक चळवळी. दुसऱ्या शब्दांत, सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत भाग घेऊन मला सक्रिय आणि जागरूक नागरिक बनण्यास मदत झाली.

दुसरे, आत्म-चिंतन हा या प्रवासाचा एक अविभाज्य भाग बनला. जेव्हा तुम्ही कार्ल मार्क्स आणि मिशेल फुकॉल्ट, गांधी आणि टागोर किंवा त्या बाबतीत, अल्बर्ट कामू आणि फ्योदोर दोस्तोयेवस्की यांच्यावर चिंतन करता तेव्हा शांत, अलिप्त, अव्यक्तिगत वाचक म्हणून अस्तित्वात राहणे अशक्य आहे; हे बहुपर्यायी कोडे सोडवून 'एक आणि एकमेव योग्य उत्तर' शोधण्यासारखे नाही. तुम्ही अस्तित्वातील संदिग्धता (existential ambiguities) स्वीकारता; तुम्ही नवीन प्रश्न विचारता; आणि तुम्ही तुमच्या स्वतःच्या इच्छा, गोंधळ, नैतिक दुविधा आणि शक्यतांकडे पाहता. दुसऱ्या शब्दांत, तुम्ही अधिक मानवी, चिंतनशील, सहानुभूतीशील आणि संवादी बनण्याची प्रवृत्ती ठेवता.

आणि तिसरे, मानव्यविद्या आणि समाजशास्त्रावरील माझ्या प्रेमामुळे माझी चिकित्सक विचारसरणी (critical thinking) अधिक धारदार झाली. हा कटुतावाद नाही. उलट, तंत्रज्ञानावर आधारित किंवा मूलतत्त्ववादी सामाजिक व्यवस्था लपवू पाहणारे प्रश्न विचारण्याची ही क्षमता आहे — उदाहरणार्थ, तंत्र-आर्थिक विकास म्हणून चित्रित केलेल्या गोष्टींची पर्यावरणीय किंमत; किंवा धार्मिक मूलतत्त्ववाद, नव-फॅसिझम आणि सामाजिक रूढीवादाशी संबंधित प्रश्न. या प्रकारच्या गंभीर विचारसरणीशिवाय लोकशाहीची भावना जोपासणे अशक्य आहे.

बरं, मी कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, डेटा सायन्स किंवा STEM विषयांचे महत्त्व कमी लेखत नाहीये. पण मग, केवळ साधनशुचिता आणि आर्थिक तर्कसंगततेच्या नावाखाली, आपण नवीन पिढीला महान कवी, गूढवादी (mystics), तत्त्वज्ञ, इतिहासकार, समाजशास्त्रज्ञ आणि कलाकारांनी मूर्त केलेल्या खजिन्यापासून वंचित ठेवले, तर नवीन पिढीच्या मानसिक, सौंदर्यात्मक आणि राजकीय संवेदनांना खूप मोठे नुकसान होईल.

आपण ज्या युगात जगत आहोत त्याचा विचार करा. जेव्हा आपण उजव्या विचारसरणीच्या राष्ट्रवादाची आणि निरंकुशतेची (authoritarianism) वाढ पाहतो, तेव्हा आपल्याला जाणवते की लोकशाही वेगाने एका प्रकारच्या निवडणूक हुकूमशाहीत बदलत आहे. आपण या नव-फॅसिस्ट आणि निवडक तंत्र-आर्थिक उच्चभ्रू यांच्यातील जवळचा संबंध देखील पाहत आहोत. अलीकडील काळात, डोनाल्ड ट्रम्प आणि एलन मस्क यांच्यातील युती हा धोकादायक ट्रेंड दर्शवते.

खरं तर, जेव्हा तंत्रज्ञान, उजव्या विचारसरणीचा राष्ट्रवाद आणि धार्मिक मूलतत्त्ववाद एकत्र येऊ लागतात, तेव्हा आपण स्वतःला एका भयानक (dystopian) जगात पाहतो. सामाजिक कल्याण, वितरणात्मक न्याय, समतावादी भावना, शांतता, पर्यावरणीय संवेदना आणि सांस्कृतिक बहुलवाद - खरं तर, सर्व मुक्तिदायी (कल्याणकारी प्रकल्प) 'डाव्या' विचारसरणीचा प्रचार म्हणून संशयाच्या किंवा निंदेच्या भोवऱ्यात येतात किंवा संशयित किंवा दूषित केले जातात. एवढेच नाही तर या प्रणालीला स्वातंत्र्यवादी शिक्षणाची (libertarian education) कल्पनाच मान्य नाही: ज्या प्रकारच्या शिक्षणामुळे माणूस विचार करतो, प्रचलित 'व्यवस्था' वर प्रश्नचिन्ह लावतो आणि युद्ध, सैन्यवाद, हवामान संकट, धार्मिक मूलतत्त्ववाद, अति-राष्ट्रवाद आणि जीवनाचे केवळ तंत्रज्ञानावर आधारित दृष्टिकोन यापासून मुक्त अशा न्यायपूर्ण जगाची कल्पना करतो.

उदारमतवादी शिक्षणाच्या कल्पनेवर वाढता हल्ला आपल्याला दिसतोय यात आश्चर्य वाटण्यासारखे नाही. आणि भारतही त्याला अपवाद नाही. खरं तर, जर आपल्याला या तंत्र-फॅसिस्ट भयानक जगाचा प्रतिकार करायचा असेल, तर आपल्याला नवीन शिक्षण पद्धतीची गरज आहे - अशा शिक्षणाची, जे प्रचलित प्रणाली चालवण्यासाठी केवळ असंवेदनशील तंत्रज्ञ किंवा आज्ञाधारक कामगार मोठ्या प्रमाणावर तयार करण्यापलीकडे पाहते. आपल्याला सर्जनशील मनांची गरज आहे जे वाढत्या तंत्र-फॅसिझमच्या जाळ्यातून कल्पनाशक्तीची ताकद वाचवू शकतील, गंभीर आणि अस्वस्थ करणारे प्रश्न विचारू शकतील आणि मानवीय जग निर्माण करण्यासाठी सतर्क, जागरूक, संवादी नागरिक म्हणून उदयास येऊ शकतील. आणि उदार कला, मानव्यविद्या आणि सामाजिकशास्त्राशिवाय हे अशक्य आहे.

**प्रा. अविजित पाठक** हे जे. एन. यू. नवी दिल्ली येथील समाजशास्त्राचे सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत.
मराठी अनुवाद : **प्रा. प्रियदर्शन भवरे** हे बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना येथे समाजशास्त्राचे अध्यापन करतात. संपर्क: bhawarepriyadarshan@gmail.com
मूळ इंग्रजी लेख द ट्रिब्युन या इंग्रजी दैनिकात दि. 10 मार्च 2025 रोजी प्रसिद्ध झाला आहे.
लेखासाठी क्लिक करा https://www.tribuneindia.com/news/comment/why-educational-institutes-must-embrace-liberal-arts/

## डॉ. शिवानंद जायभाये यांच्या वाढदिवसानिमित्त स्कूल बॅग चे वाटप



**किमगांव राजा — (महेश मुंढे) :** समाजात वावरत असताना आपण समाजाचे काही देणे लागतो ही भावना मनात ठेऊन डॉ शिवानंद जायभाये यांचा मित्र परिवार त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम राबवत असतात ,गेल्या 5 वर्षामध्ये सिंदखेड राजा तालुक्यातील विविध जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके व पेन असे विविध शालेय उपयोगी साहित्यांचे वाटप या मित्र परिवाराने केलेले आहे,त्याच अनुषंगाने आजजिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा सावखेड तेजन येथे डॉ. शिवानंद जायभाये यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना स्कूल बॅग चे वाटप करण्यात आले,डॉ साहेबांचे प्राथमिक शिक्षण याच शाळेत झालेले आहे यावेळी उपस्थितांमध्ये शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवहरी चपटे, उपाध्यक्ष जालिंदर पंढरे, गावचे सरपंच पुत्र संजय आचलखांब, व्यवस्थापन समिती सदस्य केशव काळुसे, ग्रामपंचायत उपसरपंच दत्ता डोईफोडे ,सदस्य शरद सोनुने ,विनोद विघ्ने ,सुभाष सोनुने,प्रकाश नागरे तंटामुक्ती अध्यक्ष गजानन डोईफोडे तसेच बरेच गावकरी मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीसाठी प्रभारी मुख्याध्यापक गैबीनंद घुगे, शिक्षक अजय फुलारी, शिक्षिका सोनाली खलाटे, लक्ष्मी वडगावकर, तसेच इतर उपस्थिती. डॉ. गणेश जायभाये, अनिल विघ्ने ,साईनाथ मान्टे, डॉ. अक्षय विघ्ने , रवींद्र जायभाये ,भारत जायभाये, बंडू मांटे, बंडू बुधवत,राधेश्याम सोनुने,लखन मांटे, बाबुराव जायभाये, बाळू बुधवत, सुरेश मांटे, विष्णू जायभाये, आनंदा सोनुने, गणेश विघ्ने , गबाजी सोनुने,विलास डोईफोडे, बाजीराव आंधळे, विक्रम आंधळे, कृष्णा आंधळे, लखन नागरे ,अतुल नागरे ,अनिल मांटे व यासह इतर मंडळी उपस्थित होते.